


दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ४५१ शनिवार दि २९ ऑगस्ट २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# शिंदे-फडणवीस वादात सुपरबॉस कोण? शरद पवारांच्या राष्ट्रवादीचं एकावाक्यात उत्तर

वृत्तसंस्था/मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आज कोर कमिटीची बैठक होत आहे. वाय बी चव्हाण सेंटर मध्ये ही बैठक पार पडणार आहे. आजच्या कोर कमिटीच्या बैठकीला आमदार रोहित पवार गैरहजर असतील. गैरहजेरीचं कारण आमदार रोहित पवार यांनी काही दिवसांपूर्वी पत्राद्वारे पक्षाला कळवलं आहे. या बैठकीला सुरुवात होण्याआधी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला. पक्ष संघटना वाढीबाबत आणि करण्यात येणाऱ्या बदलाबाबत बैठक आहे. विलीनीकरणाची चर्चा बैठकीत होणार नाही. अनेक लोकांना संधी देण्याबाबत आजची बैठक आहे. ऑक्टोबर नंतर राज्यात दौरे करण्याबाबत बैठक आहेफ्फ असं शशिकांत शिंदे यांनी सांगितलं.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर म्हणाले की, त्यांना नियमात दाखले देण्याबाबत सरकारने आश्वासन दिलं होतं. चार मंत्री त्यांच्यासोबत चर्चा करत आहेत. सरकारच्या वतीने त्यांनी भूमिका स्पष्ट कराव आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर ते म्हणाले की, नागपूर आणि सगळीकडेच वसतिगृहात उपोषण करण्याचा निर्णय विद्यार्थ्यांनी घेतला आहे. एक मागणी मान्य झाली आहे. बाकीचे मुद्दे तसेच आहेत. आदिवासी विकास मंत्री गंभीर नाहीत. मुख्यमंत्र्यांनी बैठक बोलावली आहे. त्यातून मार्ग निघाला पाहिजे. एवढा निधी असताना अशी गैरसोय का होतेय?

बोगस भरती करण्याचा प्रयत्न होतो आहे. त्या रॅकेटचा पर्दाफाश होत नाही, तोपर्यंत खऱ्या विद्यार्थ्यांना न्याय मिळणार नाही. मंत्र्यांचे नातेवाईक घोटाळ्यात आढळून आले आहेत असं शशिकांत शिंदे म्हणाले. शिंदे-फडणवीस वादाच्या प्रश्नावर मुख्यमंत्री सुपर बॉस आहेत हे त्यांनी हे दाखवून दिलं आहे असं शशिकांत शिंदे म्हणाले.खारघरमध्ये झेरॉक्स दुकानात  चे फॉर्म सापडले. त्यावर ते म्हणाले की, आमची निवडणूक आयोगावर हीच शंका आहे. आम्ही त्यांच्या कामावर विश्वास ठेऊन आहोत.  ची मूळ प्रत भाजप कार्यकर्त्यांकडे आली कशी?. यातून मोठ्या प्रमाणावर मतदार यादीत गडबड करण्याची शंका आहे.



# राजकारणात काम करताना महिलांना अनेक..रितू तावडे, किशोरी पेडणेकरांना भेटल्यानंतर चित्रा वाघ यांचं महत्वाचं विधान

वृत्तसंस्था/मुंबई

माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी आज चक्क महापौर बंगल्यावर जाऊन रक्षा बंधनाचा सण साजरा केला. यावेळी आजी आणि माजी महापौरांनी एकमेकांना राखी बांधत शुभेच्छा दिल्या. आणि यावेळी भाजपाच्या नेत्या चित्रा वाघ देखील उपस्थित होत्या. एरव्ही विरोधी बाकांवरुन टीकेचे बाण सोडणाऱ्या किशोरी पेडणेकर यांनी रितू तावडे आण चित्रा वाघ या राजकीय विरोधकांसोबत या सण साजरा केल्याने सर्वांनाच आश्चर्य वाटले. यावेळी सफाई कर्मचाऱ्यांसोबतही रक्षाबंधन साजरे करण्यात आले. शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या आणि माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी महापौर बंगल्यावर जाऊन स्वामींच्या मूर्तींना राखी बांधत रक्षाबंधन साजरे केले.यावेळी मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी त्यांचे स्वागत केले. भाजपच्या नेत्या चित्रा वाघ देखील यावेळी हजर होत्या.या अनोख्या भेटीबद्दल बोलताना किशोरी पेडणेकर म्हणाल्या की आपण महापौर असताना स्वामींच्या मूर्तीची स्थापना केली होती. तेव्हा पासून त्या स्वामींना राखी बांधण्यासाठी महापौर निवासस्थानी जात असतात. या अनोख्या भेटीबद्दल किशोरी पेडणेकर म्हणाल्या की रक्षाबंधनाला मी हनुमंत आणि स्वामींना राखी बांधत असते. या महापौर बंगल्याच्या पाठीमागे स्वामींच्या औंदुबर झाडाचं पुजन मी करत असते. यंदाही मी इथे येऊन रक्षाबंधन साजरे केले आहे. महापौर बंगल्याशी हे भावनिक नातं जोडलं गेलंय. त्यामुळे मी सहपरिवार येथे येऊन रक्षाबंधन साजरे केले. आज चित्रा वाघ, महापौर रितु तावडे यांच्याशीही इथेच भेट झाली. राजकारणात मतभेद राहणारच, आम्ही आपापली भूमिका मांडणार आहोत. मात्र त्यापलीकडे ही नाती असल्याचे त्यांनी सांगितले. किशोरी पेडणेकर यांनी स्वामींच्या मूर्तीची महापौर बंगल्यावर स्थापना केली आहे. किशोरी ताईंनी स्वामींचं दर्शन घेतलं, त्यांना राखी बांधली. आज आम्ही सफाई कर्मचा-यांसोबतही रक्षाबंधन साजरे केले. पक्षभेद, मतभेद असू शकतात आमच्यात मनभेद नाहीत. किशोरी ताई आणि मी दोघेही कोकणकन्या आहोत. त्यादृष्टीनं आमचं प्रेम वेगळं असल्याचे महापौर रितु तावडे यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमीत्त मुंबईत १ महिना सेवा उपक्रम राबवले जाणार आहेत. या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी या भेटीत विस्तृत चर्चा झाल्याचे देखील महापौर रितू तावडे यांनी यावेळी सांगितले. किशोरी पेडणेकर यांची मी फॅन आहे, रितुही छान काम करते. आज दुग्ध शर्करा योग जुळून आला. दोघींनी एकमेकींना राखी बांधली आणि मी या मंगल प्रसंगाची साक्षीदार आहे. आज एक स्ट्रॉन्ग मेसेज गेलाय की मतभेद असतील पण मनभेद नाहीत. राजकारणात काम करताना महिलांना अनेक कसोट्या पार पाडव्या लागतात. काम करतांना आम्ही शत्रु नाहीत, एकमेकींची ताकद आहोत. हा बॉन्ड कायम राहील असे भाजपाच्या नेत्या चित्रा वाघ यांनी या भेटीबद्दल सांगितले. आज आपण रक्षाबंधनाच्या दिवशी खास रितु तावडे यांना भेटायला आले होते असेही त्या म्हणाल्या.



दैनिक जनसंचलन



# एसटीला अच्छे दिन कधी?



गाव तिथे एसटी म हे ब्रीद जपणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाचे अर्थचक्र सध्या बिघडलेले दिसते. मध्यंतरी एसटीच्या ताफ्यात ३६०० नवीन बसगाड्या आल्याचे सांगितले गेले. २५ टक्क्यांची भाडेवाढही झाली; पण उत्पन्नवाढीचे काटे पुढे सरकत नसल्याचे दिसते. नियोजनाचा अभाव व प्रशासकीय पातळीवरील दिरंगाईचा फटका राज्यातील जनतेला बसत आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये एसटीचे मासिक उत्पन्न ९०५ कोटी रुपये होते. २५ टक्के भाडेवाढ केल्यानंतर मे २०२६ मध्ये उत्पन्नाचा आकडा ११०० कोटींवर पोहोचणे अपेक्षित होते; पण तिथपर्यंत तो आकडा पोचला नाही. किलोमीटरचा आकडा वाढविण्यासाठी लांब पल्ल्याच्या दिवसाच्या फेऱ्या चालविल्या जात असल्याचे एसटीचे अभ्यासक सांगतात. उदाहरणादाखल सांगायचे तर, एखाद्या जिल्हा ठिकाणाहून तालुकाठिकाणी सकाळच्या फेरीच्या बसमध्ये प्रवासीसंख्या चांगलीच असते; पण परतीच्या प्रवासात ती बस रिकामी धावली तर एकेरी उत्पन्नावर महामंडळ कसे चालणार? काही दिवसांपूर्वी कन्नड (जि. छत्रपती संभाजीनगर) चाळीसगाव रस्त्यावरील औट्रम घाटात बसचा मोठा अपघात थोडक्यात टळला. बसचे स्टेअरिंग घाटातील पहिल्या वळणावर लॉक झाले. बस रस्त्याच्या कडेला गेली. चालकाने कौशल्याने गाडी रस्त्यालगतचा कठडा व झाडावर नेली. चालक व काही प्रवाशांनी संकटकाळी वापरण्याचा दरवाजा उघडला आणि सर्व प्रवासी सुखरूप गाडीबाहेर पडले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी सिल्लोड आगाराच्या बसचालकाला गाडी चालवतानाच भोवळ आली. प्रसंगावधान राखून त्याने गाडीचा वेग कमी करून गाडी एका बाजूला थांबवली. सुदैवाने अपघात टळला. यातील एका उदाहरणावरून बसगाड्यांची देखभाल नियमितपणे केली जाते की नाही, याची शंका येते. ब्रेक फेल होणे, स्टेअरिंगमध्ये बिघाड आणि देखभालीकडे झालेले दुर्लक्ष यामुळे प्रवाशांचा जीव टांगणीला लागतो. याला कोण जबाबदार ? दुसरे महत्त्वाचे म्हणजे चालक, वाहकांच्या प्रकृतीचा विषयही तितकाच गंभीर आहे. कामाचा ताण, कामासाठीचा वेळ, आरोग्य तपासणी या बाबींकडे होणारे दुर्लक्ष त्यांच्या प्रकृतीवर ताण वाढवणारे आहे. नाशिक विभागात एसटीचे उत्पन्न घटल्याचे लक्षात आल्यानंतर महाव्यवस्थापकांनी अधिकाऱ्यांसोबत इगतपुरी, नाशिक आगारांत पाहणी केली. त्या पाहणीत, लॉगबुक नाही, हजेरीपत्रकात गडबड, प्रवासी सुविधांकडे दुर्लक्ष अशा गोष्टी आढळल्यानंतर ११ अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करण्यात आले. परतवाडा (जि. अमरावती) आगाराचे व्यवस्थापक कामावर असताना मद्याच्या धुंदीत असल्याचे आढळले होते. राज्यातील बहुतांश बसस्थानकांमध्ये प्राथमिक सुविधांचा अभाव आहे. परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी नुकतीच छत्रपती संभाजीनगरच्या सिडको बसस्थानकाची पाहणी केली. गलिच्छपणा, अस्वच्छता पाहून त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांच्या दौऱ्यानंतर स्वच्छता मोहीम राबविली गेली; पण त्यात सातत्य राहील का? अन्यथा, तात्पुरती स्वच्छता आणि पुन्हा प्रवाशांच्या वाट्याला तुटकी बाकडे, अस्वच्छ स्वच्छतागृहे, उशिराने येणाऱ्या बसगाड्या हेच येत राहील. राज्याचा विचार केल्यास २१ विभाग तोट्यात असल्याचे सांगितले जाते. परिवहनमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना ङ्गउत्पन्न वाढवा अन्यथा कारवाई होईलफ असा निर्वाणीचा इशारा दिला आहे. विशेष तपास पथक नेमून प्रत्येक आगाराच्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाणार असल्याचा निर्णय चांगला आहे. वेळेचे योग्य नियोजन, स्वच्छ बसस्थानक, सुरक्षित प्रवास, एसटीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची आर्थिक, आरोग्यविषयक काळजी घेऊन प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार ही पावले टाकणे गरजेचे आहे. तसे केले तरच एसटीला खऱ्या अर्थाने ङ्गअच्छे दिनफ येतील, अन्यथा या जीवनवाहिनीची अवस्था आणखी बिकट होईल.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# नेपाळमध्ये 'जलप्रलय'!



## तिबेटजवळ पुरामुळे ४०० लोक बेपत्ता, १०५ भारतीयांचा समावेश

काठमांडू : तिबेटमधून अचानक आलेल्या पुरामुळे नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात प्रचंड विध्वंस झाला आहे. भोटेकोशी नदीच्या पाण्याच्या पातळीत अचानक वाढ झाल्याने तिमुरे आणि स्याब्रुबेसी भागातील अनेक घरांचे नुकसान झाले आहे. रसुवा येथील एक जलविद्युत प्रकल्पही पुराच्या तडाख्यात सापडून वाहून गेला आहे. आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. पुरामुळे मोठ्या संख्येने लोक बेपत्ता आहेत. नेपाळच्या पर्यटन विभागाच्या माहितीनुसार, सुमारे 400 लोक बेपत्ता आहेत. यामध्ये १०५ भारतीय नागरिकांसह २११ परदेशी पर्यटकांचा समावेश आहे.

### महापुरामुळे बिहारला 'हाय अलर्ट'

नेपाळच्या वरच्या बाजुच्या डोंगराळ भागात आणि पाणलोट क्षेत्रात सततच्या मुसळधार पावसामुळे आलेल्या महाप्रलयाचा धोका भारताला आहे. या जलप्रलयामुळे बिहारवर पुन्हा एकदा पुराचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. नेपाळमधून मोठ्या प्रमाणात पाणी येत असल्यामुळे गंडक नदीचा प्रवाह वेगाने वाढत आहे, त्यामुळे राज्य सरकार आणि प्रशासनाने सावधानतेचा इशारा दिला आहे. जाणकारांच्या अंदाजानुसार, नदीच्या पाणी पातळीतील या वेगाने होणाऱ्या वाढीमुळे ३ मीटर उंचीच्या लाटा येऊ शकतात. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, सर्व बाधित सीमावर्ती आणि मैदानी जिल्ह्यांमध्ये युद्धपातळीवर सुरक्षा व्यवस्था आणि तयारी सुरू करण्यात आली आहे.



बुधवारी सकाळी तिबेटला लागून असलेल्या नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात विनाशकारी अचानक आलेल्या पुरामुळे अनेक गावे उद्ध्वस्त झाली आणि मोठ्या प्रमाणातील पायाभूत सुविधांचे नुकसान झाले. पुरामुळे नदीकाठच्या भागात प्रचंड विध्वंस झाला आणि किमान डझनभर जलविद्युत प्रकल्पांचे नुकसान झाले. भोटे कोशी नदीला तिबेटच्या बाजूने सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास (स्थानिक वेळेनुसार) पूर आला. या अचानक आलेल्या पुराचा परिणाम रसुवा आणि धादिंग जिल्ह्यांवर, तसेच काठमांडूच्या नैऋत्येकडील नुवाकोट जिल्ह्यावर झाला. नेपाळ पर्यटन मंडळाने (एनटीबी) एक निवेदन जारी करून सांगितले की, रसुवामधील पुरामुळे एकूण ३८४ प्रवासी बेपत्ता आहेत, ज्यात २११ परदेशी नागरिक आणि ९३ नेपाळी नागरिकांचा समावेश आहे. या बेपत्ता प्रवाशांमध्ये १०५ भारतीय, ३७ अनिवासी भारतीय (एनआरआय) आणि अमेरिका, मलेशिया, युके, दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया व नेदरलँड्समधील इतर पर्यटकांचा समावेश आहे. सम्राट टूर्स अँड ट्रॅव्हल एजन्सीने कळवले आहे की, बेपत्ता झालेल्या भारतीयांपैकी किमान ५९ जण कैलास मानसरोवर यात्रेकरू होते.



**पथके तैनात..** आपत्ती व्यवस्थापन दल कोणत्याही संभाव्य आपत्तीपासून लोकांचे संरक्षण करण्यासाठी पूर्णपणे सज्ज आहेत. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची (एनडीआरएफ) विशेष पथके गोपालगंज आणि बेतिया येथे पाठवण्यात आली आहेत, तर मुझफ्फरपूरमध्ये एक पथक सज्ज ठेवण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, बिहार राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची पथके देखील तैनात केली जात आहेत. सशस्त्र सीमा बलाच्या डीआयजींनी देखील आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ मदत पुरवण्यासाठी त्यांच्या जलद प्रतिसाद पथकाला सतर्क केले आहे.

### भारत नेपाळच्या पाठीशी : मोदी



नेपाळमध्ये आलेल्या आपत्तीच्या प्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळचे पंतप्रधान बालेन शाह यांच्याशी फोनवरून चर्चा केली आहे. या आपत्तीत झालेल्या जीवितहानीबाबत शोक व्यक्त केला आहे. या संकटसमयी भारतीय जनता नेपाळमधील बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभी आहे, असे आश्वासन पंतप्रधान मोदी यांनी नेपाळच्या पंतप्रधानांना दिले आहे. या कठीण काळात भारत नेपाळला सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे. तसेच मदत आणि बचाव कार्यासाठी आमची पथके एकमेकांशी समन्वय साधत आहेत, अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली.

## एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांसह सहा जणांना अटक; २ सप्टेंबरपर्यंत कोठडी

■ मुंबई/वृत्तसंस्था

**एमपीएससी पेपर फुटी प्रकरणात कारवाई**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक, गट-ब पदाच्या परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणात मुंबई गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांसह एकूण सहा जणांना अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्यांमध्ये खासगी क्लासचालक, संबंधित उमेदवाराच्या नातेवाईकांसह अन्य व्यक्तींचा समावेश असल्याची माहिती आहे. सर्व आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता त्यांना 2 सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

या कारवाईमुळे एमपीएससीच्या औषध निरीक्षक परीक्षेतील गैरप्रकाराचा तपास आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. पेपर नेमका कुठून फुटला, तो कोणाच्या माध्यमातून बाहेर गेला, त्याचा लाभ कोणाला मिळाला आणि या संपूर्ण प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास गुन्हे शाखेकडून सुरू आहे. औषध निरीक्षक परीक्षेतील प्रश्नपत्रिका बाहेर जाण्याच्या प्रकरणात एमपीएससीमधीलच काही कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याचा संशय तपास यंत्रणेला आहे. त्यानुसार गुन्हे शाखेने एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांना अटक केली आहे. याशिवाय या



प्रकरणाशी संबंधित खासगी व्यक्तींनाही अटक करण्यात आली आहे. यामध्ये क्लासचालक आणि संबंधित परीक्षार्थ्यांच्या नातेवाईकाचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. एकूण सहा आरोपींना अटक झाल्यानंतर आता त्यांची कसून चौकशी केली जात आहे. या चौकशीतून पेपरफुटीची संपूर्ण साखळी उघड होण्याची शक्यता आहे.

### पेपरफुटी वरून आमदार रोहित पवार आक्रमक

**पुणे :** अन्न व औषध प्रशासन विभागाच्या औषध निरीक्षक पदाच्या भरती परीक्षेतील गैरप्रकार चव्हाट्यावर आल्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या संपूर्ण प्रकरणात पहिल्या दिवसापासून आवाज उठवणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार गट) आमदार रोहित पवार यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेत राज्य सरकार आणि एमपीएससीच्या कारभारावर जोरदार हल्लाबोल केला.

# महाप्रलयाचे भयंकर तांडव! नेपाळमध्ये १६० जणांचा मृत्यू; १३३ भारतीयांसह ८४४ जण बेपत्ता!

जनसंचलन/बुलढाणा

नेपाळ-तिबेट सीमेवरील भागात बुधवारी सकाळी भोटे कोशी आणि त्रिशुली नद्यांना आलेल्या अभूतपूर्व पूर आणि भूस्खलनामुळे हाहाकार उडाला आहे. काही मिनिटांतच तब्बल ३० फुटांपर्यंत वाढलेल्या पाण्याच्या प्रचंड लोंढ्याने अनेक गावे, जलविद्युत प्रकल्प आणि कैलास-मानसरोवर यात्रेचा मार्ग वाहून नेला. या महाप्रलयात आतापर्यंत १६० जणांचा मृत्यू झाला असून, १३३ भारतीय नागरिकांसह सुमारे ८४४ हून अधिक जण अद्याप बेपत्ता आहेत. दरम्यान नेपाळमध्ये अडकलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांनी तात्काळ माहिती नोंदविण्याचे आवाहन जिल्हाधिकारी प्रवीण देवरे यांनी केले आहे. नेपाळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नेपाळमध्ये १५७ जणांचा मृत्यू झाला आहे, तर तिबेटच्या केरोंग प्रांतात ३ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद चीनी अधिकाऱ्यांनी केली आहे. बेपत्ता ५७९ परदेशी नागरिकांमध्ये अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया आणि मलेशियासह २८ देशांतील पर्यटकांचा समावेश आहे. यात १३३ भारतीय आणि ३७ अनिवासी भारतीयांचा समावेश आहे. नेपाळच्या रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला



आलेल्या पुरामुळे परिस्थिती गंभीर बनली असून, महाराष्ट्रातील काही नागरिक व पर्यटक अडकले असल्याची माहिती आहे. दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील नागरिक किंवा पर्यटक नेपाळमध्ये अडकले असतील, अथवा कुटुंबीयांशी संपर्क होत नसेल, तर घाबरू नका, त्यांच्या कुटुंबीयांनी, नातेवाईकांनी तात्काळ अधिकृत माहिती नोंदवावी, माहिती नोंदणी लिंक (https://reference-url-citation.invalid/0)) याप्रमाणे आहे. नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण, हॉटेल, प्रवासाचा तपशील आणि कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक अचूकपणे नोंदवावा तसेच आपत्कालीन संपर्क ( जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्ष : ०७२६२-२४२६८३ (पोलीस नियंत्रण कक्ष : ०७२६२- २४२४००) टोल फ्री : १०७७ मोबाईल : ७०२०४३५९५४ येथे संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. एकही नागरिक मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाकडून माहिती संकलन व संबंधित यंत्रणांशी समन्वय सुरू आहे.

# शासकीय आयटीआय संस्थांना ड्रायव्हिंग स्कूलची मान्यता देण्याच्या निर्णयाला स्थगिती द्या

## बुलढाणा जिल्हा ड्रायव्हिंग स्कूल चालक-मालक संघटनेचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

जनसंचलन/बुलढाणा

शासकीय आयटीआय संस्थांना ड्रायव्हिंग स्कूलची मान्यता देण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या निर्णयामुळे राज्यातील मान्यताप्राप्त ड्रायव्हिंग स्कूल संचालक आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांवर उपासमारीची वेळ येणार आहे. हा अन्यायकारक निर्णय त्वरित स्थगित करण्यात यावा, या मागणीसाठी ड्रायव्हिंग स्कूल चालक-मालक संघटना, बुलढाणा जिल्हा यांच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, केंद्रीय रस्ते वाहतूक महामार्ग मंत्री आणि राज्य परिवहन मंत्र्यांसह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत एक सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे.या निवेदनात संघटनेने म्हटले आहे की, देशातील आणि राज्यातील मान्यताप्राप्त ड्रायव्हिंग स्कूल चालक अनेक वर्षांपासून शासनाचे जबाबदार प्रतिनिधी म्हणून अत्यंत प्रामाणिकपणे वाहनचालक तयार करण्याचे कार्य करत आहेत. या संस्थांमधून प्रशिक्षण घेतलेले हजारो युवक आज एसटी महामंडळ, टॅक्सी सेवा, मालवाहतूक, खाजगी उद्योग तसेच विविध शासकीय व खाजगी क्षेत्रात चालक म्हणून कार्यरत असून, ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत. त्यामुळे रोजगार निर्मितीमध्ये या खाजगी ड्रायव्हिंग स्कूलचे मोठे योगदान लाभले आहे. याशिवाय, या संस्था रस्ते सुरक्षा अभियान, वाहतूक नियम जनजागृती आणि सुरक्षित वाहनचालक प्रशिक्षण यांसारख्या उपक्रमांमध्ये स्वतःच्या खर्चाने शिबिरे व जनजागृती मोहिमा राबवून आरटीओ प्रशासनाला सतत सहकार्य करत असतात. यासाठी त्यांना कोणतेही विशेष शासकीय आर्थिक साहाय्य देखील मिळत नाही.अशा बिकट परिस्थितीत शासनाने शासकीय आयटीआय संस्थांना ड्रायव्हिंग स्कूलची मान्यता दिल्यास राज्यातील हजारो मान्यताप्राप्त खाजगी ड्रायव्हिंग स्कूल संचालकांचा व्यवसाय पूर्णपणे बंद पडेल. परिणामी, त्यांच्याकडे कार्यरत कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ येऊन मोठ्या प्रमाणावर बेरोजगार निर्माण होईल, अशी भीती संघटनेने व्यक्त केली आहे. संघटनेचा शासनाला विरोध नसून दर्जेदार आणि आधुनिक प्रशिक्षण देण्यास ते पूर्णपणे तयार आहेत.या निवेदनाद्वारे ड्रायव्हिंग स्कूल संचालकांनी शासनाकडे काही महत्त्वपूर्ण मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने शासकीय आयटीआय संस्थांना ड्रायव्हिंग स्कूलची मान्यता देण्याच्या निर्णयाला तात्काळ स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली आहे.



तसेच विद्यमान मान्यताप्राप्त ड्रायव्हिंग स्कूलचा दर्जा उंचावण्यासाठी शासनाने विशेष योजना जाहीर करावी, ड्रायव्हिंग स्कूलना तांत्रिक () संस्थेचा दर्जा देऊन बँक कर्ज, अनुदान व इतर शासकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी विनंती करण्यात आली आहे. यासोबतच आधुनिक ड्रायव्हिंग सिम्युलेटर, डिजिटल वाहतूक शिक्षण व प्रशिक्षणासाठी आर्थिक साहाय्य देण्यात यावे आणि प्रत्येक जिल्ह्यात शासनामार्फत आय.डी.टी.आर. () प्रशिक्षण ट्रॅक उभारून त्याचा वापर मान्यताप्राप्त ड्रायव्हिंग स्कूलना उपलब्ध करून देण्यात यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. शासनाने ड्रायव्हिंग स्कूल संघटनांशी सकारात्मक चर्चा करूनच या विषयावर अंतिम निर्णय घ्यावा आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये खाजगी चालकांचा व्यवसाय धोक्यात आणणारा निर्णय घेऊ नये, अशी नम्र विनंती या निवेदनातून करण्यात आली आहे.

# अखेर आऊट ऑफ रडार तुपकर प्रकटले! मंत्र्यांच्या बंगल्याकडे कूच करताच पोलिसांनी पकडले

जनसंचलन/बुलढाणा



सकाळपासून पोलिसांना हुलकावणी देत आऊट ऑफ रडार असलेले शेतकरी नेते तथा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक रविकांत तुपकर अखेर मुंबईत प्रकटले! पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त चुकवत गनिमी काव्याने आंदोलन करण्याचा प्रयत्न करत तुपकरांनी मंत्र्यांच्या बंगल्याच्या दिशेने कूच करताच पोलिसांची एकच धावपळ उडाली. तुपकरांना रोखण्यासाठी पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्यांना ताब्यात घेतले. यावेळी तुपकरांसमवेत असलेल्या अनेक कार्यकर्त्यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले असून, आंदोलकांना पोलिसांच्या वाहनांमध्ये कोंबून नेण्यात आले. मंत्रालय परिसर आणि मंत्र्यांच्या शासकीय बंगल्यांभोवती पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असतानाही तुपकरांनी पोलिसांच्या नजरेतून निसटत आंदोलनस्थळी पोहोचण्याचा प्रयत्न केला. ज्या भागात पोलिस बंदोबस्ताची उणीव आहे, तो मार्ग हेरून तुपकरांनी आपल्या समर्थकांसह पुढे जाण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात येत आहे. तुपकर अचानक समोर येताच पोलिसांची चांगलीच धावपळ उडाली. मंत्र्यांच्या बंगल्याच्या दिशेने तुपकर आणि कार्यकर्त्यांनी कूच करताच पोलिसांनी त्यांना अडवले. यावेळी तुपकर अत्यंत आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. त्यांना आवरताना पोलिसांची अक्षरशः दमछाक झाली. तुपकरांना पोलिसांनी अडवताच आंदोलकांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. ङ्गसरकार हमसे डरती है, पुलिस को आगे करती है!फ अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. पोलिसांचा विरोध झुगारून पुढे जाण्याचा प्रयत्न आंदोलकांकडून सुरू होता. दरम्यान, पोलिसांनी तातडीने कारवाई करत तुपकरांसह कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. अनेक कार्यकर्त्यांना पोलिसांच्या वाहनांमध्ये बसवण्यात आले. ऐनवेळी झालेल्या या घडामोडींमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. तुपकरांच्या आजच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सकाळपासून मुंबई पोलिसांनी मंत्रालय परिसर, मंत्र्यांचे बंगले, आमदार निवास आणि मरीन ड्राइव्ह परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. मरीन ड्राईव्हवर अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेण्यात आले, तर क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष डॉ. टाले यांनाही अटक करण्यात आली. इतका मोठा पोलिस बंदोबस्त असतानाही तुपकर मात्र बराच वेळ पोलिसांच्या रडारवर आले नव्हते. त्यामुळे ङ्गतुपकर नेमके कुठे आहेत?फ हा प्रश्न चर्चेत असतानाच त्यांनी अचानक एंट्री घेत मंत्र्यांच्या बंगल्याच्या दिशेने कूच केली. ताब्यात घेण्यापूर्वी माध्यमांशी बोलताना रविकांत तुपकरांनी सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार असतानाही सरकारकडून पोलिसांच्या माध्यमातून दडपशाही केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. कार्यकर्त्यांची धरपकड, वाहनांची अडवणूक आणि आंदोलन रोखण्यासाठी लावण्यात आलेला प्रचंड पोलिस बंदोबस्त हा सरकारच्या दडपशाहीचा प्रकार असल्याचे सांगत तुपकरांनी त्याचा निषेध केला.



# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी २३ कोटी ३३ लाखांची मदत; बुलढाण्याला सर्वाधिक १० कोटी ७८ लाखांचा निधी

## ७ हजार ६५८ शेतकऱ्यांना मिळणार दिलासा; मदत थेट बँक खात्यात जमा होणार मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील

**जनसंचलन-बुलढाणा**

जून आणि जुलै २०२६ मध्ये झालेल्या अतिवृष्टी, पूरस्थिती, चक्रीवादळ आणि गारपीटीमुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा दिला आहे. राज्यातील बाधित शेतकऱ्यांसाठी २३ कोटी ३३ लाख ३१ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, यामध्ये बुलढाणा जिल्ह्यासाठी तब्बल १० कोटी ७८ लाख ५७ हजार रुपयांची सर्वाधिक मदत मंजूर झाली आहे. जिल्ह्यातील ७ हजार ६५८ बाधित शेतकऱ्यांच्या ५ हजार ४८९.९१ हेक्टर क्षेत्रावरील पीक नुकसानीसाठी ही मदत मिळणार आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली.नैसर्गिक आपत्तीमुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक आधार मिळावा, यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. बुलढाणा जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना मंजूर झालेली १० कोटी ७८ लाख ५७ हजार रुपयांची मदत ही राज्यासाठी मंजूर झालेल्या एकूण निधीतील मोठा हिस्सा आहे. त्यामुळे खरीप हंगामातील नुकसानीने आर्थिक अडचणीत आलेल्या हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा हात मिळणे आवश्यक आहे. बुलढाणा जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. मंजूर झालेला निधी शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून सावरण्यासाठी निश्चितच आधार देईल,फक्त असे मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी सांगितले. मदत व पुनर्वसन विभागाने २७ ऑगस्ट २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करून राज्यातील अतिवृष्टी, पूरस्थिती, चक्रीवादळ व गारपीटग्रस्त शेतकऱ्यांसाठी निधी मंजूर केला आहे. राज्यातील ११ हजार २०७.७९ हेक्टर क्षेत्रावरील पीक नुकसानीसाठी १७ हजार २४५ शेतकऱ्यांना एकूण २३ कोटी ३३ लाख ३१ हजार रुपयांची मदत देण्यात येणार आहे. यामध्ये अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ आणि बुलढाणा जिल्ह्यांतील ९ हजार ६८३ बाधित शेतकऱ्यांसाठी १३ कोटी ८० लाख ७४ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी बुलढाणा जिल्ह्याला १० कोटी ७८ लाख ५७ हजार रुपये मिळणार आहेत. पुणे विभागातील पुणे व सातारा जिल्ह्यांतील ६ हजार ५६५ शेतकऱ्यांसाठी ९ कोटी १३ लाख २२ हजार रुपये, नागपूर विभागातील वर्धा जिल्ह्यातील ६६१ शेतकऱ्यांसाठी ३८ लाख ८७ हजार रुपये, तर कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १६ बाधित शेतकऱ्यांसाठी ४१ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. बाधित शेतकऱ्यांना मंजूर करण्यात आलेली मदत प्रणालीद्वारे थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, ही मदत रक्कम शेतकऱ्यांच्या जुन्या कर्जाच्या परतफेडीसाठी अथवा वसुलीसाठी वळती करून घेऊ नये, अशा कडक सूचना सर्व बँकांना देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, असे मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी स्पष्ट केले. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणारी मदत पूर्णपणे त्यांच्या उपयोगासाठी उपलब्ध होणार आहे. मदत वाटप करताना एकाच शेतकऱ्याला एकाच नुकसानीसाठी दुबार लाभ मिळणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्याच हंगामात यापूर्वी मदत मिळालेल्या लाभार्थ्यांना त्याच क्षेत्रासाठी पुन्हा मदत देताना द्विरुक्ती होणार नाही, याची विशेष खबरदारी घेण्यात येणार आहे.

## कर्तव्यावर सज्ज असणाऱ्या लोकसेवकांना राखी बांधून शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी साजरा केला रक्षाबंधन सोहळा



**जनसंचलन/बुलढाणा**

सण कोणताही असो, नागरिक आपापल्या घरी कुटुंबीयांसोबत आनंद साजरा करत असताना, समाजाच्या सुरक्षेसाठी आणि सेवेसाठी अहोरात्र कर्तव्यावर सज्ज राहणाऱ्या कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शासकीय अध्यापक महाविद्यालय (बी.एड. कॉलेज), बुलढाणा येथील विद्यार्थिनींनी अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरा केला. महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हा सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबवण्यात आला. सण-उत्सवाच्या काळात प्रवाशांची ने-आण करण्यासाठी आपल्या घरापासून दूर असणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बुलढाणा बस स्थानकावरील चालक आणि वाहक बंधूंना विद्यार्थिनींनी राख्या बांधल्या. स्वतःच्या बहिणीपासून दूर असलेल्या एसटी कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर या उपक्रमामुळे एक वेगळाच आनंद आणि समाधान पाहायला मिळाले. नागरिकांच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असणाऱ्या पोलीस दलातील कर्मचारी तसेच विविध ठिकाणी कार्यरत असणाऱ्या सुरक्षा रक्षकांनाही विद्यार्थिनींनी राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्याची आणि सुरक्षिततेची प्रार्थना केली. कर्तव्यावर असताना मिळालेल्या या आदर आणि आपुलकीच्या प्रेरणेने पोलीस बांधव व सुरक्षा रक्षकांनीही विद्यार्थिनींचे मनापासून आभार मानले. आपले सण-उत्सव विसरून लोकसेवेत व्यस्त असणाऱ्या खऱ्या रक्षकांचा सन्मान करत शासकीय अध्यापक महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सामाजिक एकोपा आणि कृतज्ञतेचा नवा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. महाविद्यालयाच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## जैन समाजाचा समाज गौरव समारंभ संपन्न !

**जनसंचलन/बुलढाणा**



अखिल दिगंबर जैन सैतवाल संस्था बुलढाणा तालुक्याच्यावतीने आयोजित समाज गौरव समारंभात गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी व समाजातील इतर मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. दिगंबर जैन मंदिरासमोरील भगवान महावीर सभागृहात दि. २२ रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे राष्ट्रीय सहमंत्री रुपेश वायकोस होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून जिल्हाध्यक्ष अरविंद सैतवाल होते. प्रमुख उपस्थिती मध्ये ज्येष्ठ धर्मप्रेमी वसंतराव संतोषे, ग्रंथ मित्र नेमिनाथ सातपुते, दिगंबर जैन संस्थेचे अध्यक्ष सचिन जैन, चिखली गटशिक्षणाधिकारी उमेश जैन, शेतकरी संघटनेचे नेते नितीन सोनटक्के डॉ. कल्पना बोराळकर, डॉ . शेजल निरखे, अविनाश जैन, संजय माडीवाले आदी उपस्थित होते. आचार्य श्री आर्यनंदी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. तालुक्यातील दिगंबर जैन समाजातील दहावी, बारावी, पदवी, पदविका, स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा उत्तीर्ण झालेल्या युवक युवतींचा व उल्लेखनीय विशेष प्राधान्य मिळवणाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यामध्ये ३७ प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांना समाज गौरव प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. नीलेश नामदेवराव जैन यांची वस्तू व सेवा कर विभागात असिस्टंट कमिशनर पदी सेवानिवृत्ती झाल्याबद्दल तसेच सेवापुर्ती केलेले जैन शिक्षक अनिल वायकोस , अरविंद सोनुने महावीर चव्हाण यांनाही सन्मान करून गौरविण्यात आले. अरविंद सैतवाल यांनी कार्यक्रमाचा उद्देश व संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली. सेट परीक्षा उत्तीर्ण आनंद जैन व यश आंबेकर या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात चेतन महाजन, सचिन जैन , हिरालाल जैन, डॉ. शेजल निरखे, डॉ. कल्पना बोराळकर यांनी शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले

# राखीच्या नात्याला दिला शब्द;उमेदच्या महिला सखींना न्याय मिळवून देण्यासाठी आमदार सिद्धार्थ खरात मैदानात!

**जनसंचलन- मेहकर**

लाडक्या बहिणींच्या नावावर मतं घेतली, सत्ता मिळवली; आता त्याच बहिणींना सरकार विसरलं का? असा थेट सवाल आमदार सिद्धार्थ खरात यांनी सरकारला केला आहे. रक्षाबंधनाच्या निमित्ताने महिलांनी आमदार सिद्धार्थ खरात यांना राखी बांधत आपल्या समस्या मांडल्या. यावेळी लाडकी बहीण योजनेची रक्कम १५०० रुपयांवरून किमान २१०० नव्हे, तर ३ हजार रुपयांपर्यंत वाढवावी, अशी मागणी करण्यात आली. उमेद अभियानातील महिला सखींच्या मानधनाचाही गंभीर प्रश्न आमदार खरात यांनी उपस्थित केला. गावागावात



बचत गट उभे करून महिलांना सक्षम करणाऱ्या महिला सखींना नियमित मानधन मिळत नसल्याने त्यांच्यात नाराजी असल्याचं त्यांनी म्हटलं. फक्त घोषणा करून चालणार नाही, महिलांना प्रत्यक्ष आर्थिक मदत द्यावी लागेल, असा आक्रमक इशारा देत हा प्रश्न विधानसभेत लावून धरणार असल्याचं आमदार खरात यांनी स्पष्ट केलं.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८